तावडे हॉटेल चौकात पुणे -बेंगलोर महामार्गावर हे आंदोलन झाले. ना. राणे यांच्या प्रतीकात्मक फलकास युवा सैनिकांनी जोडे मारले. त्यांचा फोटो पायाखाली घेऊन तुडविण्यात आला. 'नारायण राणे कोण रे .... कोंबडी चोर र रे ...' यासह अन्य बोचऱ्या घोषणांनी महामार्ग आंदोलकांनी दणाणून सोडला. अर्धा तास वाहतूक ठप्प होऊन, वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

शेवटी आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतले. युवा सेना जिल्हाप्रमुख मंजीत माने, संदीप पाटील, शिवाजी पाटील, जिल्हा उपप्रमुख विनायक जाधव, राहुल पाटील, सुमीत पवार, सागर जाधव आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कबड्डीच्या विकासासाठी कोल्हापुरात पोषक वातावरण

भारतीय संघाचे माजी प्रशिक्षक श्रीनिवास रेड्डी यांचा विश्वास; एकत्रित प्रयत्नांची आवश्यकता

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

छत्रपती शाहू महाराज यांच्या पाठबळामुळे कोल्हापूरची ओळख क्रीडानगरी अशी बनली आहे. यामुळे कबड्डीसारख्या खेळासाठी कोल्हापूरचे वातावरण पोषक आहे. शासकीय पाठबळ मिळाल्यास कोल्हापुरातून आंतरराष्ट्रीय दर्जाचे कबड्डीपटू घडतील, असा विश्वास भारतीय कबड्डी संघाचे माजी प्रशिक्षक श्रीनिवास रेड्डी यांनी व्यक्त केला.

कोल्हापूर जिल्हा कबड्डी संघटना व कबड्डी 'राव'ज ॲकॅडमीतर्फे उजळाईवाडी परिसरात उभारलेल्या कबड्डी ॲकॅडमीला मंगळवारी त्यांनी भेट दिली. ॲकॅडमीत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांसह देशभरातील विविध राज्यांतून कबड्डीपटू प्रशिक्षणासाठी येत आहेत. याबद्दल रेड्डी यांनी समाधान व्यक्त केले.

देशातील इतर राज्ये तसेच परदेशातील अनेक देशांत कोल्हापूरच्या 'राव'ज ॲकॅडमीच्या निम्म्यानेही इनडोअर मैदान, अत्याधुनिक मॅट उपलब्ध नसतात. तरीही तेथे आंतरराष्ट्रीय खेळाडू निर्माण होतात. याउलट कोल्हापुरात इतर खेळांप्रमाणेच कबड्डीसाठीही पोषक वातावरण आहे. कसदार खाणे, पोषक हवामान, मोठ्या संख्येने खेळाडू, विविध मूलभूत आणि आधुनिक सोयीसुविधा, तज्ज्ञ प्रशिक्षक यांची उपलब्धता आहे. याचा वापर करून इथल्या खेळाडूंना कबड्डी खेळात करिअर सहजशक्य असल्याचे रेड्डी यांनी सांगितले.

प्रो-कबड्डीमुळे कबड्डी या खेळात व्यावसायिकता आली आहे. पश्चिम महाराष्ट्रासह कोल्हापूर जिल्ह्यातून अनेक खेळाडू प्रो-कबड्डीला मिळाले असून, आज त्यांच्यावर कोट्यवधी रुपयांची बोली लागत आहे. कबड्डीच्या या बदलत्या ट्रेंडमध्ये कोल्हापूरकरांनी योग्य पद्धतीने नियोजन केल्यास येथून अनेक खेळाडू घडतील, असाही विश्वास रेड्डी यांनी व्यक्त केला.

लोकप्रतिनिधींची कार्यवाही, शासकीय पाठबळ, ॲकॅडमी व तज्ज्ञ प्रशिक्षकांचे प्रशिक्षण आणि पालकांचे प्रोत्साहन अशा सांघिक प्रयत्नांची गरज असल्याचे रेड्डी यांनी सांगितले.

नोकरीपुरते खेळाकडे पाहू नका

नोकरीपुरते खेळाकडे पाहू नका. सरावात सातत्य राखत, अपडेट राहून खेळाच्या तंत्रात सातत्याने बदल करा. कोणतेही काम इतरांपेक्षा वेगळे म्हणजेच 'युनिक' करण्याचा प्रयत्न करा, असा सल्ला रेड्डी यांनी दिला.

दरम्यान, जिल्हा कबड्डी असोसिएशन व कबड्डी 'राव'ज ॲकॅडमीतर्फे श्रीनिवास रेड्डी यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी कोल्हापूर जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष संभाजी पाटील, उपाध्यक्ष अजित पाटील, आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक डॉ. रमेश भेंडीगिरी, ज्येष्ठ ॲथलेटिक्स प्रशिक्षक सुभाष पवार, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त कबड्डीपटू उमा भोसले-भेंडीगिरी, अण्णासाहेब गावडे, सर्जेराव पाटील यांच्यासह पदाधिकारी व खेळाडू उपस्थित होते.



कोल्हापूर : कबड्डी असोसिएशन व कबड्डी 'राव'ज ॲकॅडमीतर्फे श्रीनिवास रेड्डी यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी संभाजी पाटील, अजित पाटील, आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक डॉ. रमेश भेंडीगिरी, सुभाष पवार, उमा भोसले-भेंडीगिरी, अण्णासाहेब गावडे, सर्जेराव पाटील आदी उपस्थित होते.

कबड्डीमुळे सर्व काही मिळाले

कबड्डी खेळामुळे आपणाला सर्व काही मिळाले. जीवनात किमान एकदा विमानात बसण्याची इच्छा होती. कबड्डीमुळे आजपर्यंत असंख्यवेळा विमान प्रवास केला. कबड्डीमुळेच सुपरस्टार अमिताभ बच्चन यांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबासोबत संवाद साधता आला. आज कोठेही गेलो तरी कबड्डीमुळे कोणतीही अडचण येत नाही. किंबहुना, कोल्हापुरातही आपण कबड्डीच्या नात्यानेच आल्याचे रेड्डी यांनी सांगितले.

इचलकरंजीत पोस्ट कार्यालय फोडले

इचलकरंजी : पुढारी वृत्तसेवा

येथील स्टेशन रोडवर असणाऱ्या जवाहरनगर पोस्ट कार्यालयाचा कडी-कोयंडा उचकटून चोरट्यांनी अडीच हजार रुपये किमतीची २,३३५ तिकिटे व २०७ पोस्टकार्ड लंपास केली. ही घटना मंगळवारी सकाळी उघडकीस आली. याबाबतची वर्दी चंदू बापू खराटे (रा. रूकडी) यांनी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात दिली आहे. ना. बा. एज्युकेशन संस्थेतील चोरीची घटना ताजी असतानाच आता पोस्ट कार्यालयही फोडण्यात आल्यामुळे पोलिसांनी गस्त वाढवावी, अशी मागणी होत आहे.

न्यू पॉलिटेक्निकमध्ये विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

कोल्हापूर : श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संचलित न्यू पॉलिटेक्निक उचगाव या कॉलेजमध्ये प्रथम वर्ष डिप्लोमा इंजिनिअरिंगसाठी ज्या विद्यार्थ्यांचे आई किंवा वडील कोरोनामुळे दगावले असतील अशा दहावी पास विद्यार्थ्यांसाठी अत्यंत माफक फी घेऊन प्रवेश दिला जाणार आहे. या योजनेचा संबंधित विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. तसेच अधिक माहितीसाठी न्यू पॉलिटेक्निक उचगाव येथे संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेचे चेअरमन के. जी. पाटील आणि प्राचार्य विनय शिंदे यांनी केले आहे.



कोल्हापूर : पूरग्रस्तांना सिमेंट पोती वाटपप्रसंगी कृष्णराज महाडिक, देवराज बारदेस्कर, मानसिंग तोरसे आदी.

महाडिक यांच्याकडून पूरग्रस्तांना बांधकाम साहित्याची मदत

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

भुदरगड तालुक्यातील शेणगाव येथे महापुराचा अनेक कुटुंबांना मोठा फटका बसला. काही घरांची पडझड झाली. अनेक घरांचे मोठे नुकसान झाले. बेघर झालेल्या कुटुंबांना माजी खासदार धनंजय महाडिक व कृष्णराज महाडिक यांनी घर बांधण्यासाठी साहित्याची मदत केली. ८०० सिमेंट पोत्यांचे वाटप करण्यात आले.

जिल्ह्यावर कोणत्याही प्रकारची आपत्ती ओढवली की संकटग्रस्तांच्या मदतीला सर्वप्रथम महाडिक कुटुंबीय धावून जाते. हीच परंपरा कायम राखत कृष्णराज महाडिक यांनी शेणगावमधील पूरग्रस्तांना मदत रूपाने मोठा दिलासा दिला. शेणगाववासीय ही मदत कधीच विसरणार नाहीत, असे उद्‌गार देवराज बारदेस्कर यांनी काढले. भुदरगड तालुक्यातील शेणगाव येथे पूरग्रस्तांना मदत वाटप कार्यक्रमात ते बोलत होते. पुरामुळे बाधित झालेल्या शेणगाववासीयांना घरांच्या पुनर्बांधणीसाठी कृष्णराज महाडिक यांच्याकडून तब्बल ८०० पोती सिमेंट देण्यात आले. शेणगावसह भुदरगड तालुक्यात १३ गावांतील पूरग्रस्तांना घरे दुरुस्तीसाठी सिमेंट पोती देण्यात आली. लवकरच या कुटुंबांना जीवनावश्यक साहित्यही देणार असल्याचे कृष्णराज महाडिक यांनी सांगितले. यावेळी देवराज बारदेस्कर, मानसिंग तोरसे, राजेंद्र शिंदे, सुनील कोरे, शुभम वायचळ उपस्थित होते.

मंत्री राणे यांच्या अटकेच्या निषेधार्थ भाजपची निदर्शने

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना नाट्यमयरीत्या हुकूमशाही पद्धतीने अटक करण्यात आली. माजी मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्री असलेल्या जबाबदार नेत्याला एका वक्तव्यामुळे झालेल्या या अटकेच्या निषेधार्थ भाजपाच्या वतीने बिंदू चौकात निदर्शने करून राज्य सरकारचा निषेध करण्यात आला. जिल्हाध्यक्ष राहुल चिकोडे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन झाले.

चिकोडे म्हणाले, लोकशाहीच्या दुष्टीने आजचा दिवस निंदनीय आहे. दिवसभर घरात बसून असणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी स्वातंत्र्य दिनाबद्दल अभ्यास करून वक्तव्य करणे अपेक्षित आहे. सरकार गेल्या दीड वर्षात अत्यंत चुकीच्या पद्धतीने वागत आहे. कोरोनामुळे या बिघाडी सरकारमधील मंत्र्यांच्या अनेक चुका झाकल्या गेल्या आहेत. सर्वसामान्य जनता या तीघाडी सरकारचा तालिबानी कारभार प्रत्यक्ष अनुभवत असून आगामी काळात त्यांना जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही.

संघटन सरचिटणीस अशोक देसाई म्हणाले, नारायण राणे यांना झालेली अटक निषेधार्ह आहे. सरचिटणीस विजय जाधव म्हणाले, केंद्रीय मंत्र्यांना अटक होण्याची दुर्दैवी घटना महाराष्ट्राच्या इतिहासात प्रथमच घडली आहे. प्रवक्ते अजित ठाणेकर म्हणाले, राणे यांना झालेली अटक बेकायदेशीर आहे. सरचिटणीस हेमंत आराध्ये, गणेश देसाई, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत घाटगे, राजू मोरे, मारुती भागोजी, सचिन तोडकर उपस्थित होते.



कोल्हापूर : केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या अटकेच्या निषेधार्थ भाजपच्या वतीने मंगळवारी बिंदू चौकात निदर्शने करण्यात आली.

आत्महत्येसाठी निघालेल्या महिलेला रोखले

इचलकरंजी : पुढारी वृत्तसेवा

येथील पंचगंगा नदीत उडी घेऊन आत्महत्या करण्याच्या अनुषंगाने नदीकाठ परिसरात फिरणाऱ्या महिलेला सतर्कतेने रोखण्यात आले. पोलिसांच्या पथकाने त्या महिलेस ताब्यात घेतले.

यळगूड येथील बेपत्ता अल्पवयीन मुलीचा शोध घेण्यासाठी पंचगंगा नदी परिसरात आज पथक कार्यरत होते. यावेळी स्मशानभूमीलगतच्या रस्त्यावरून एक महिला पंचगंगा नदीपात्राकडे वेगाने जात असल्याचे फिरोज नदाफ, संतोष मोकाशी व हर्ष जैन यांच्या निदर्शनास आले. त्यांनी याबाबतची माहिती अप्पर पोलिस अधीक्षक जयश्री गायकवाड, गावभागचे प्रभारी विकास अडसूळ यांना दिली. घटनेचे गांभीर्य ओळखून निर्भया पथकाच्या प्रमुख तेजश्री पवार यांनी महिलेला थांबवले. महिलेने उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र, घरगुती वादातून आत्महत्या करण्यास ती निघाल्याचे निष्पन्न झाले. पोलिस ठाण्यात आणून तिचे समुपदेशन करण्यात आले.

samasta **JOB OPPORTUNITIES**

Samasta Microfinance Limited
is hiring for

CUSTOMER RELATIONSHIP OFFICER, BCM, BM

Welcoming applications from Fresher/ Experienced candidate with MFI/NBFC experience.

Education Qualification : HSC/12, PUC, ITI, Diploma or any Graduation

Salary : Rs.10,000/- Gross for freshers and for Experienced 11,000 to 12,000/- (Incentives, TA & DA additional)

Work Location: Gadhinglaj, Murgud, Kudal, Kankavali, Ratnagiri, Chiplun, Mapusa & Margoa

INTERVIEW DATE & VENUE

Date : **27-August-2021 (Friday)**
Address: **Shree Mahalaxmi Mangal Karyalay, Kavla Naka, KOLHAPUR**

Date : **28-August-2021 (Saturday)**
Address: **Near DNS Bank, Sahyadri Nagar, Nachne, RATNAGIRI**

CALL
Kadam Dnyaneshwar : 9421454221
Sujay Namannavar : 8123981269
Akash Mudhale : 8237204730

Note : TWO Wheeler & DL, Aadhar & PAN is Must

Interested candidates walk-in for an Interview with your Resume and other Documents

शाहूनगरमध्ये पाण्यासाठी रास्ता रोको आंदोलन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शहरातील शाहूनगरमध्ये मंगळवारी संतप्त महिलांनी पाण्यासाठी रास्ता रोको आंदोलन केले. सुमारे अर्धा तास झालेल्या आंदोलनामुळे वाहतूक विस्कळीत झाली. आंदोलनस्थळी आलेल्या अधिकाऱ्यांवर महिलांनी प्रश्नांची सरबत्ती केली. अखेर पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी यापुढे पाणीपुरवठा सुरळीत होईल, अशी ग्वाही दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

शाहूनगर, नवशा मारुती परिसरात गेले पंधरा दिवस पाणीपुरवठा झालेला नाही. याविषयी स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा विभागीय पाणीपुरवठा कार्यालयाशी व अधिकाऱ्यांशी संपर्क साधला, तरीही पाणीपुरवठा झाला नाही. टँकरद्वारेही पाणी मिळत नसल्याने नागरिकांचे पाण्यासाठी प्रचंड हाल सुरू आहेत. परिणामी, पाण्यासाठी वैतागलेल्या नागरिकांनी उत्स्फूर्तपणे रास्ता रोको आंदोलन केले. घटनास्थळी पोलिस दाखल झाले. त्यांनी महापालिका पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधून आंदोलनाची माहिती दिली. त्यानंतर अधिकारी घटनास्थळी आले.

ज्येष्ठ सेवा संघातर्फे आज व्याख्यान

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

राजर्षी शाहू ज्येष्ठ नागरिक सेवा संघाच्या वतीने बुधवारी (दि. २५) सकाळी अकरा वाजता टाऊन हॉल बागेतील बाळासाहेब ठाकरे विरंगुळा केंद्रामध्ये 'कोरोना'वर डॉ. मानसिंगराव जगताप यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघ जिल्हाध्यक्षपदी प्रा. टी. एस. दुर्गी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा





प्रा. टी. एस. दुर्गी, प्रा. संजय मोरे

कोल्हापूर जिल्हा कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघाच्या जिल्हाध्यक्षपदी प्रा. टी. एस. दुर्गी, तर सचिवपदी प्रा. संजय मोरे यांची एकमताने निवड करण्यात आली. महासंघाचे विभागीय अध्यक्ष प्रा. पी. एन. औताडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीत पीठासीन अधिकारी म्हणून प्रा. अशोक पाटील व प्रा. आनंदराव देशमुख यांनी काम पाहिले.

२०२१ ते २०२६ या काळासाठी कार्यकारिणी अशी : कार्याध्यक्ष-प्रा. डी. बी. गायकर, प्रा. तुकाराम सरगर, उपाध्यक्ष-प्रा. अमरसिंह शेळके, प्रा. रामचंद्र गावडे, प्रा. संदीप सावगावे, कोषाध्यक्ष-प्रा. शिवाजीराव होडगे, सह कोषाध्यक्ष-प्रा. नारायण राणे, सहसचिव-बी. के. मडिवाळ, परीक्षाविभाग प्रमुख-प्रा. अनिता चौगले, प्रसिद्धी प्रमुख-प्रा. अमर चव्हाण, चंद्रशेखर कांबळे.

गुडेतील तरुणावर आणखी एक गुन्हा

पन्हाळा : पुढारी वृत्तसेवा

पन्हाळागड पायथ्याशी असणाऱ्या गुडे गावात सिद्धेश कदम याने आणखी एका अल्पवयीन मुलीला अश्लील व्हिडीओ दाखवून तिचा विनयभंग केला असल्याची फिर्याद मुलीच्या आईने पन्हाळा पोलिसांत दिली. पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

दरम्यान, सोमवारच्या गुन्ह्यात कदम याला पन्हाळा न्यायालयात हजर केले असता त्याला दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

खादी और ग्रामोद्योग आयोग
KHADI AND VILLAGE INDUSTRIES COMMISION
सूक्ष्म, लघू और मध्यम उद्यम मंत्रालय, भारत सरकार
Ministry of Micro, Small and Medium Enterprises, Govt. of India
केन्द्रीय मधुमक्खी अनुसन्धान एवम प्रशिक्षण संस्थान
CENTRAL BEE RESEARCH AND TRAINING INSTITUTE

केंद्रीय मधुमक्षिकापालन संशोधन व प्रशिक्षण संस्था, खादी ग्रामोद्योग आयोग, सूक्ष्म व लघू आणि मध्यम उद्यम मंत्रालय, भारत सरकार, पुणे-१६ ही अखिल भारतीय स्तरावर एकमेव अशी मधुमक्षिकापालन उद्योग या विषयावर संशोधन व प्रशिक्षण देणारी संस्था आहे. ह्या संस्थेमार्फत मधुमक्षिकापालनामध्ये निरनिराळे प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात. वर्ष २०२१-२२ करिता इच्छुक उमेदवारांकडून खालील प्रशिक्षणाकरिता अर्ज मागविण्यात येत आहे.

(अ) मधुमक्षिका पालन प्रशिक्षण

अ. क्र.	प्रशिक्षण कार्यक्रम	कालावधी
१	मधमाशापालन प्रमाणपत्र (ऑनलाईन / ऑफलाईन)	एक महिना
२	एलिमेंटरी मधमाशापालन (ऑनलाईन / ऑफलाईन)	पंधरा दिवस
३	अल्पावधी मधमाशापालन (ऑनलाईन / ऑफलाईन)	पाच दिवस
४	राजान्य, पराग, प्रपोलीस, मेन, संकलन व संरक्षण प्रशिक्षण (ऑफलाईन)	पाच दिवस
५	मधमाशापालन प्रशोधन प्रशिक्षण (ऑफलाईन)	पाच दिवस
६	मध परीक्षण प्रशिक्षण (ऑफलाईन)	एक दिवस
७	विशेष प्रशिक्षण मध प्रशोधन आणि मध विश्लेषण (ऑफलाईन)	पाच दिवस
८	आग्या मधमाशी प्रशिक्षण (ऑफलाईन)	पाच दिवस
९	मधमाशापालन जनजागृति कार्यक्रम (ऑनलाईन / ऑफलाईन) फक्त स्वयंसेवी संस्थेकरिता	एक दिवस

१) वरील प्रशिक्षण क्र. १ मधमाशापालन प्रमाणपत्र (ऑनलाईन/ऑफलाईन)करिता फक्त SC / ST आणि BPL उमेदवारांना रुपये ३,०००/- शिष्यवृत्ति (Stipend) देण्यात येईल.
२) वरील प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थीची राहण्याची व्यवस्था अतिथिगृहात फक्त मर्यादित प्रशिक्षणार्थीकरीता सशुल्क करण्यात येईल. जेवणाची व्यवस्था स्वत: करावी लागेल.
३) प्रशिक्षणाच्या सुरुवातीला मधमाशा प्रमाणपत्र प्रशिक्षणाकरिता रु. १०००/- अनामत जमा करावी लागेल.
४) **वरील क्र. १ प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता अर्ज पाठविण्याची अंतिम तारीख ३० नोव्हेंबर २०२१ आहे. तसेच वरील प्रशिक्षणाकरिता छापील अर्ज व इतर माहितीकरिता संस्थेच्या खालील पत्त्यावर संपर्क साधावा.**
अधिक माहितीकरिता दूरध्वनी क्र. ०२०-२५६७५८६५, २५६५५३५१, मो. क्र. ७३८५२८९७०९, ९०२१७७०१२८. **(Email : cbrtipune.kvic@gov.in)**

ब) हनी मिशन : सी.बी.आर.टी.आय. हनी मिशन कार्यक्रम संभाव्य SHG (१०-१५) सदस्य ग्रुप असणाऱ्या SHG कडून अर्ज मागविण्यात येत आहेत, जे SHG मधमाशीपालनपूरक ठिकाणातील आहेत, त्या SHG ग्रुपला स्वतःच्या योगदानातील १०-२०% रक्कम भरावयाची आहे, ८०-९०% अनुदान KVIC कडून देण्यात येणार आहे. या कार्यक्रमामध्ये १० (एपिस मेलीफेरा) प्रजाती मधमाशीचे बी बॉक्सेस प्रतीव्यक्ती देण्याचे प्रस्तावित आहे. तरी इच्छुक SHG ग्रुपने खालील पत्त्यावर ई-मेल संपर्क करावा.

क) मधू प्रशोधन यंत्र : केंद्रीय मधुमक्षिका संशोधन व प्रशिक्षण संस्थान, खादी और ग्रामोद्योग आयोग द्वारे संस्थेमध्ये उपलब्ध असलेल्या मधू प्रशोधन यंत्रमध्ये मध प्रशोधन करणेकरीता, मधपाळ / मध उद्योजक यांचेकरीता व्यवस्था करण्यात आली आहे. तरी इच्छुक मधपाळांनी / मध उद्योजकांनी ह्या संधीचा फायदा घ्यावा, तसेच संबंधित मधपाळांनी ह्या संस्थेच्या प्रभारी यांचेशी संपर्क साधावा.

निदेशक/प्राचार्य
११५३, गणेशखिंड रोड, पुणे- ४११०१६
1153, Ganeshkhind Road, Pune-411016
टेली /Tele : 020-25675865 फॅक्स / Fax : 020-25655351
वेबसाईट / Website : www.kvic.org.in
ई-मेल / E-mail - cbrtipune.kvic@gov.in/cbrti.kvic@gmail.com

ज्ञानदीप को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., मुंबई
(नोंदणी क्र. बी. ओ. एम/आर. एस. आर/९०४ सन १९७८)
प्रशासकीय कार्यालय :- साई एनक्लेव्ह, विक्रोळी (पूर्व), मुंबई - ४०० ०८३.

बेचाळीसाव्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासन व मा. सहकार आयुक्त सहकारी संस्था पुणे यांच्या निर्देशानुसार अधिमंडळाची ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ०५/०९/२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता **मराठा मंडळ सांस्कृतिक केंद्र, वासुदेव बळवंत फडके मार्ग, (९० फूट रस्ता), मुलुंड पूर्व मुंबई ४०० ०८१** या ठिकाणी प्रत्यक्षपणे सर्व नियमांचे पालन करून व ऑनलाईन पध्दतीने व्हिडिओ कॉन्फरन्स अथवा ओएव्हिएम Other Audio Visual Menas च्या माध्यमातून सुध्दा होणार आहे. तरी आपण सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

-: सभेपुढील विषय :-

१. **दिनांक २७/०३/२०२१ रोजी झालेल्या ४१ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**
२. **संचालक मंडळाने सादर केलेला दिनांक ३१ मार्च २०२१ अखेरचा वार्षिक अहवाल, नफा-तोटा पत्रक व ताळेबंद पत्रक यांना मंजुरी देणे.**
३. **संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.**
४. **सन २०२०-२०२१ च्या अंदाजपत्रकातील खर्चाची माहिती देऊन त्यास व सन २०२१-२२ वर्षाकरीता तयार केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.**
५. **सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेणे.**
६. **सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षकाची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरवणे.**
७. **संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबतची माहिती देणे.**
८. **कर्ज निर्लेखन प्रस्तावास मान्यता देणे.**
९. **सभेस अनुपस्थित असणा-या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.**
१०. **मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.**

आपला सहकारी,
चंद्रकांत ढमाळ
सचिव
संचालक मंडळाच्या अनुज्ञेने

ठिकाण :- विक्रोळी (पूर्व) मुंबई ४०० ०८३
दिनांक :- १७/०८/२०२१

- विशेष सूचना -

१. कोविड-१९ मुळे राज्य शासनाच्या दिनांक ३०/०७/२०२१ च्या निर्देशानुसार ५० पेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास निर्बंध असल्याने प्रत्यक्ष सभेसाठी प्रथम येणाऱ्या सभासदास प्राधान्य दिले जाईल. इतर सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करण्यात येईल.
२. सदर सभा ऑनलाईन पध्दतीने सुध्दा होणार असल्याने सभासद इंटरनेट सुविधा उपलब्ध असलेल्या संगणक, लॅपटॉप व स्मार्ट फोनद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सहभागी होऊ शकतील.
३. संस्थेत उपलब्ध असलेल्या सभासदांच्या मोबाईल क्रमांकावर प्रथम दोन दिवस अगोदर व सभा सुरू होण्यापूर्वी ऑनलाईन सभेची लिंक सभासद क्रमांक व पासवर्ड पाठविण्यात येईल.
४. संस्थेकडे मोबाईल क्रमांकाची नोंद न केलेल्या सभासदांनी त्यांचे पूर्ण नाव, मोबाईल क्रमांक, सभासद क्रमांक व ई-मेल आयडी dccsadm@gmail.com या संकेतस्थळावर नोंदवल्यास सदर सभासदांना अधिमंडळाच्या वार्षिक सभेची लिंक पाठविण्यात येईल.
५. सभासद सभेच्या नमूद वेळेच्या पंधरा मिनिटे आधी लिंक वर जॉईन होऊ शकतील.
६. सभासदांना विषय पत्रिकेतील विषयांबाबत काही प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी दिनांक २८ ऑगस्ट २०२१ पूर्वी पत्राद्वारे मुख्य कार्यालयात किंवा वरील संकेतस्थळावर पाठवावेत.
७. गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास वरील सभा प्रत्यक्ष/ऑनलाईन (VC/OAVM) पद्धतीने त्याच दिवशी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व अशा तहकूब झालेल्या सभेला गणसंख्येची आवश्यकता असणार नाही. जितके सभासद प्रत्यक्षात व संस्थेने दिलेल्या लिंकवर नमूद केलेप्रमाणे अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहतील त्यांची उपस्थिती सभेसाठी गणसंख्या मोजताना धरली जाईल.
८. काही अनपेक्षित परिस्थिती तसेच तांत्रिक कारणामुळे सदर सभेचे कामकाज खंडित झाल्यास तांत्रिक त्रुटीचे निवारण झाल्यानंतर त्याच लिंकवर लगेच सभेचे कामकाज पुन्हा सुरू केले जाईल, याची सभासदांनी कृपया नोंद घ्यावी.
९. सभासदांना लॉगीनबाबत काही तांत्रिक अडचणी असल्यास **techsupport@eagm.cloud** या ईमेल आयडीवर अथवा ९६१९२८०४५५ या क्रमांकावर तसेच संस्थेच्या ९७६६४००७०१/७०२ क्रमांकावर दिनांक ०५/०९/२०२१ रोजी सकाळी १० वाजता संपर्क करण्यात यावा. कोणत्याही सभासदास तांत्रिक अडचणीमुळे सभेत जॉईन होता आले नाही तर संस्था जबाबदार राहणार नाही.
१०. सभासदांनी वार्षिक अहवालाची प्रत संस्थेच्या नजिकच्या शाखेतून घेवून जावी. सभेची सूचना / वार्षिक अहवाल संस्थेच्या www.dnyandeep.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
११. लाभांशाची रक्कम बचत खाते जमा करण्यात येत असल्याने सभासदांना विनंती करण्यात येते की, आपले बचत खाते नजीकच्या शाखेत त्वरित सुरु करावे.
१२. ज्या सभासदांची बचत खाती नसल्यामुळे लाभांश रक्कम प्राप्त झाली नाही त्यांनी ती त्वरित घेवून जावी. लाभांशाची रक्कम घेवून न गेल्यास ती पोटनियमातील तरतुदीप्रमाणे राखीव निधीत वर्ग केली जाईल.
१३. आपल्या पत्त्यातील बदल व मोबाईल क्रमांक त्वरीत नजीकच्या शाखा कार्यालयात कळविण्यात यावा व आधार कार्ड झेरॉक्स संस्थेमध्ये जमा करावे.

टीप : अहवाल संस्थेच्या सर्व शाखांमध्ये नोटीस दाखविल्यानंतर मिळेल.

आरबीएल बँक
अपनो का बँक

आरबीएल बँक लिमिटेड

सिआयएन: L65191PN1943PLC007308
नोंदणीकृत कार्यालय : १ली गल्ली, शाहूपुरी, कोल्हापूर - ४१६००१.
फोन : +९१२३१ ६६५०२१४ । फॅक्स : +९१२३१ २६५७३८६
वेबसाईट: www.rblbank.com । ई-मेल: investorgrievances@rblbank.com

व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) किंवा अन्य ऑडिओ-व्हिजुअल साधनांद्वारे (ओएव्हीएम) द्वारा आयोजित बँकेच्या ७८व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसंदर्भात सभासदांकरिता नोटीस

नोटीस देण्यात येते कि, **आरबीएल बँक लिमिटेड** (बँक) च्या भागधारकांची ७८वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दि. २१ सप्टेंबर २०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) द्वारा किंवा अन्य ऑडिओ-व्हिजुअल साधनांद्वारे (ओएव्हीएम) सर्वसाधारण सभेच्या नोटीसमध्ये नमूद कामकाज करण्यासाठी होणार आहे.

सध्या फैलावत असलेल्या कोविड -१९ या जागतिक महामारीच्या पार्श्वभूमीवर, कॉर्पोरेट अफेयर्स मंत्रालय (एमसीए) यांनी त्यांच्या परिपत्रक क्रमांक १४/ २०२० दि. ८ एप्रिल, २०२०, परिपत्रक क्र. १७/२०२० दि. १३ एप्रिल, २०२०, परिपत्रक क्र. २०/२०२० दि. ५ मे, २०२०, परिपत्रक क्र. ०२/२०२१ दि. १३ जानेवारी २०२१ आणि सेबीने त्यांच्या परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी१/सीआयआर/पी/२०२०/७९ दि. १२ मे, २०२० व परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी२/सीआयआर/पी/२०२१/११ दि. १५ जानेवारी, २०२१ द्वारा वार्षिक सर्वसाधारण सभा व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) किंवा अन्य ऑडिओ व्हिज्युअल माध्यमांद्वारे (ओएव्हीएम) आयोजित करणेस परवानगी देण्यात आली आहे आणि सार्वजनिक ठिकाणी सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय सभा पार पाडणेस मुभा दिली आहे. कंपनी कायदा २०१३ व सेबी (लिस्टिंग बंधने व प्रकटीकरण आवश्यकता) रेग्युलेशन-२०१५, एमसीए व सेबी परिपत्रके यामधील तरतुदीचे पालन करणेच्या दृष्टिकोनातून बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) किंवा अन्य ऑडिओ व्हिज्युअल माध्यमांद्वारे (ओएव्हीएम) आयोजित केली जात आहे. सभासद व्हीसी अथवा ओएव्हीएमद्वारे येत्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सहभागी होऊ शकतात.

वरील एमसीए व सेबी यांच्या परिपत्रकानुसार, सभेच्या नोटिसीसह आर्थिक वर्ष २०२०-२१ च्या वार्षिक अहवालाची इलेक्ट्रॉनिक प्रत, बँक/डिपॉजिटरी/रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजंट यांचेकडे ई-मेल आयडी नोंद केलेल्या सभासदांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविणेत येतील. ७८व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस व आर्थिक वर्ष २०२०-२१ चा वार्षिक अहवाल https://ir.rblbank.com या बँकेच्या संकेतस्थळावरही डाऊनलोड करणेकरीता उपलब्ध असेल. स्टॉक एक्सचेंज अर्थात बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com या संकेतस्थळावरही वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस पाहता येईल. सीडीएसएल (सभेदरम्यान रिमोट ई-वोटिंग सुविधा आणि ई-मतदान प्रणाली प्रदान करणारी एजन्सी) च्या www.evotingindia.com या संकेतस्थळावरसुद्धा नोटीस प्रसारित करणेत येईल. सभेमध्ये सहभागी होण्याकरिताच्या सूचना सभेच्या नोटीसमध्ये प्रदान केल्या जातील. कंपनी कायदा, २०१३ मधील कलम १०३ अंतर्गत कोरमची निश्चिती पाहणेकरिता व्हीसी/ओएव्हीएम द्वारे सभेमध्ये उपस्थित असलेल्या सदस्यांची उपस्थिती मोजण्यात येईल.

ई-मेल आयडी/मोबाईल क्रमांक नोंद नसलेल्या सभासदांकरिता, रिमोट इ-वोटिंग/ इ-वोटिंगकरीता लॉग-इन तपशिल मिळविणे आणि वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सहभागी होणेसाठीची प्रक्रिया :

- फिजिकल स्वरूपात शेअर्स असणाऱ्या सभासदांकरीता : कृपया आपला फोलिओ क्र., नाव, शेअर सर्टिफिकेटची दोन्ही बाजूने स्कॅन केलेली प्रत, स्व-साक्षांकित पॅनची प्रत, स्व-साक्षांकित आधार कार्डची प्रत हे सर्व investorgrievances@rblbank.com किंवा rnt.helpdesk@linkintime.co.in. या मेल-आयडीवर मेल करावे.
- डिमॅट स्वरूपात शेअर्स असणाऱ्या सभासदांकरीता : कृपया आपला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक आपल्या डिपॉजिटरी पार्टीसिपंट (डीपी) यांचेकडे नोंद करावा.
- डिमॅट स्वरूपात शेअर्स असणाऱ्या व्यक्तिगत सभासदांकरिता : कृपया आपला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक आपल्या डिपॉजिटरी पार्टीसिपंट (डीपी) यांचेकडे नोंद करावा जो इ-वोटिंगचे वेळी व सभेमध्ये सहभागी होण्याकरिता अनिवार्य आहे.

ई-वोटिंगद्वारे मतदानाची पद्धत :

- सेबी परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी/सीआयआर/पी/२०२०/२४२ दि. ९ डिसेंबर २०२० नुसार, सूचीबद्ध कंपन्यांनी दिलेल्या ई-मतदान सुविधे अंतर्गत, डिमॅट स्वरूपात शेअर्स धारण केलेल्या वैयक्तिक भागधारकांना त्यांच्या डिपॉझिटरीज आणि डिपॉझिटरी पार्टीसिपंट यांचेकडे असलेल्या डिमॅट खात्याद्वारे मतदान करण्याची परवानगी आहे. इ-मतदान सुविधेचा वापर करण्यासाठी भागधारकांनी त्यांच्या डीमॅट खात्यांमध्ये त्यांचा मोबाईल क्रमांक आणि ईमेल आयडी अद्यावत करावा.
- सभासदांना, सभेच्या नोटीसमधील विषयांवर रिमोट ई-वोटिंग द्वारे तसेच सभेच्यावेळी ई-वोटिंगद्वारे मतदान करण्याची संधी असेल.
- रिमोट ई-वोटिंग व सभेच्यावेळी ई-वोटिंगद्वारे मतदान याची विस्तृत प्रक्रिया सभेच्या नोटिसमध्ये देणेत येईल. तसेच सदर तपशिल बँकेच्या संकेतस्थळावरही उपलब्ध करणेत येईल.
- वरीलप्रमाणे सभासदांनी त्यांचा इ-मेल अड्रेस नोंद/अद्यावत केल्यानंतर इ-वोटिंगकरिता आवश्यक असणारा लॉग इन चा तपशील सभासदांना इ-मेलद्वारे उपलब्ध करून देणेत येईल.

तसेच, देशामध्ये फैलावत असलेली कोविड -१९ महामारी आणि त्यातून निर्माण होणारी अनिश्चितता याचा विचार करून व दूरदृष्टी ठेवून बँकेने दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी लाभांश प्रस्तावित केलेला नाही.

आरबीएल बँक लिमिटेडकरीता
निती आर्या
कंपनी सचिव

ठिकाण: मुंबई
दिनांक: २४ ऑगस्ट २०२१